प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र विद्या प्राधिकरणाची पुनर्रचना राज्यस्तरीय निवड समितीबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांकः डायट/प्र.क्र.२०/(१६२४४३३)प्रशिक्षण,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२
दिनांक: १२ जून, २०२६

**संदर्भ:-** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः डायट ४५१६/(४०/१६)/ प्रशिक्षण, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६.

**प्रस्तावना :-**

विद्या प्राधिकरणाचे मुख्यालयाच्या ठिकाणी व प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या ठिकाणी विषयनिहाय सक्षमीकरणासाठी योग्य व्यक्तींची निवड होणे आवश्यक आहे, जेणे करुन सदर प्राधिकरणांना त्यांच्या कामांचे उद्दिष्ट गाठता येऊ शकेल. सदर प्राधिकरणांवर तसेच संसाधन समूहांमध्ये योग्य व्यक्तींची निवड करण्यासाठी निवड समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. तथापि, सदर प्रक्रिया विहीत कालमर्यादेत पूर्ण होणे आवश्यक आहे.

२. याकरिता, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे तसेच प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथील “विषय सहायक” ही पदे उसनवारी तत्त्वावर भरण्याबाबत निवड प्रक्रियेत समाविष्ट अर्जदारांमधून विषय सहायकांची निवड करण्यासाठी प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४.०३.२०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत राज्यस्तरीय समितीने यापुढे विषय सहायकांची राज्यस्तरीय निवड प्रक्रिया आयुक्त (शिक्षण) यांच्या स्तरावरून राबविण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.त्यानुषंगाने राज्यस्तरीय निवड समितीच्या रचनेत बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र विद्या प्राधिकरणाची पुनर्रचना या विभागाच्या शासन निर्णय दि. १७ ऑक्टोबर, २०१६ अन्वये करण्यात आली आहे. तसेच, सदर शासन निर्णयान्वये विद्या प्राधिकरणाची रचना, पदांची संरचना,विद्या प्राधिकरणाची कार्ये व निवड समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यात प्रामुख्याने राज्य स्तरीय निवड समितीची रचना परिच्छेद (५) (५.१.१) मध्ये नमूद केल्यानूसार खालीलप्रमाणे आहे.

**५.१.१ राज्यस्तरीय निवड समितीची रचना -**

प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय निवड समितीची स्थापना करण्यात येत आहे. त्याची संरचना खालीलप्रमाणे राहील.

अध्यक्ष- प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
सहअध्यक्ष- आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सदस्य सचिव संचालक, विद्या प्राधिकरण
सदस्य - विद्या प्राधिकरणातील अधिकारी
सदस्य - DIET मधील अधिकारी
सदस्य - जिल्हा प्रशासनाचे अधिकारी

सदर समितीमधील सदस्यांची निवड अध्यक्ष व सहअध्यक्ष करतील.

२. उपरोक्त प्रमाणे राज्यस्तरीय समितीची रचना निश्चीत केलेली आहे. तथापि, शासन निर्णय दि. १७ ऑक्टोबर, २०१६ मधील राज्यस्तरीय समितीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

**५.१.१ राज्यस्तरीय निवड समितीची रचना -**

आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय निवड समितीची स्थापना करण्यात येत आहे. त्याची संरचना खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदनाम | कार्यालय |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष | आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| २. | सदस्य सचिव | संचालक, शैक्षणिक संशोधन व शैक्षणिक परिषद महाराष्ट्र पुणे |
| ४. | सदस्य | विद्या प्राधिकरणातील अधिकारी |
| ५. | सदस्य | DIET मधील अधिकारी |
| ६. | सदस्य | जिल्हा प्रशासनाचे अधिकारी |

सदर समितीमधील सदस्यांची निवड अध्यक्ष करतील.

३. शासन निर्णय दि. १७ ऑक्टोबर, २०१६ मधील अन्य सर्व सूचना व तरतुदी कायम राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६१२१२४६२३०२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by MOHINUDDIN B TASHILDAR
Date: 2026.06.12 12:50:41 +05'30'

**( मो. बा. ताशिलदार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, लोकभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री राज्य उत्पादन शुल्क यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
६. मा.मुख्य सचिव, यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, (सर्व विभाग) मंत्रालय, मुंबई,
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त ( शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. आयुक्त, महानगरपालिका (सर्व),महाराष्ट्र राज्य
११. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , महाराष्ट्र ,पुणे
१२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र शिक्षण परिषद मुंबई.
१३. शिक्षण संचालक ( प्राथमिक ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च-माध्यमिक ), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१६. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)
१७. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ( सर्व )
१८. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / योजना), जिल्हा परिषद ( सर्व )
१९. निवड नस्ती (प्रशिक्षण-कार्यासन)